# - प्रेस नोट -

दि. १८/०७/२०२६

## वाकोला पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १७/०७/२०२६ रोजी ००.३० वा. च्या सुमारास फिर्यादी श्री. सलीम अब्दुल अजिज शेख, वय-३६ वर्षे, धंदा - नोकरी, रा. ठी. कलिना सांताक्रुझ, मुंबई हे बांधकाम साईड एम.आय.ए.एल.सी.आय.एस.एफ.कॅम्प, गेट नं ८, कलिना सांताक्रुझ, मुंबई येथे इतर कामगारांसोबत झोपलेले असतांना अटक आरोपी पुरूष वय- ३५ वर्षे, हा कामगार मोठ मोठयाने आरडा ओरड करत झोपेत व्यत्यय आणत होता म्हणुन फिर्यादी यांनी त्याला समजवले या रागातुन त्याने फिर्यादीला शिविगाळ करत जिवे ठार मारण्याची धमकी देवुन अंगावर धावुन येवुन त्याच्या कडील चाकु फिर्यादीच्या माने जवळ खुपसला व फिर्यादीला गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.१७/०७/२०२६ रोजी गु.र.क्र.८२९/२६, कलम १०९(१), ३५२, ३५१(३) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------